3 1 AUG 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सेक्शन-८' कंपनीमुळे कौशल्य विकासाला बळ

## सतेज पाटील : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी स्वीकारले मान्यतेचे पत्र

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** 'शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशन'ला कंपनी कायद्यानुसार सेक्शन-८ कंपनी म्हणून मान्यता मिळाली आहे. हे कोल्हापूरसाठी अभिमानास्पद आहे. या कंपनीमुळे विद्यापीठाला कौशल्य विकास आणि स्टार्ट-अप कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिक गतिमानतेने काम करता येईल, असे प्रतिपादन पालकमंत्री सतेज पाटील यांनी सोमवारी येथे केले.

सेक्शन-८ कंपनीच्या मान्यतेचे पत्र केंद्रीय कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाकडून प्राप्त झाले. पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी ते स्वीकारले. यावेळी ते बोलत होते. जिल्ह्यातील भूस्खलन आणि हवामान बदलाबाबत संशोधन व विश्लेषण करण्यासाठी विद्यापीठाने नोडल एजन्सी म्हणून पुढाकार घ्यावा. पूर व्यवस्थापनाच्या कार्यातही संशोधकीय योगदान द्यावे. विद्यापीठाचे नवोपक्रम, प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी सदैव सहकार्य राहील, असे पालकमंत्री पाटील यांनी सांगितले. त्यांचे स्वागत कुलगुरू डॉ. शिर्के यांनी ग्रंथभेट देऊन केले. यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, डॉ. आर. के. कामत, एस. एस. महाजन, एम. एस. देशमुख, ए. डी. जाधव, संजय जाधव, अभिजित रेडेकर उपस्थित होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.



कोल्हापुरात सोमवारी शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशनला सेक्शन-८ कंपनी म्हणून मान्यता प्राप्त झाल्याचे पत्र कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांना पालकमंत्री सतेज पाटील यांनी प्रदान केले. यावेळी अभिजित रेडेकर, एम. एस. देशमुख, संजय जाधव, पी. एस. पाटील, विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, गजानन पळसे, आदी उपस्थित होते.

### विद्यापीठाने पाच वर्षांचा आराखडा तयार करावा

- संशोधनाचा दर्जा आणि नॅकच्या ए-प्लस मूल्यांकनामुळे विद्यापीठाला अनेक मोठमोठ्या संधी आणि निधी उपलब्ध होणार आहे. त्याचा योग्य विनियोग करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने पुढील पाच वर्षांचा आराखडा तयार करावा. डिसेंबरपर्यंत कोल्हापूर विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे.
- दोन महामार्गांनी हा भाग देशाच्या इतर भागांशी जोडलेला आहे. त्यामुळे आता जागतिक कनेक्टिव्हिटी वाढविण्याची संधी विद्यापीठासही आहे. त्याचा लाभ घेण्यास सज्ज व्हावे, असे आवाहन पालकमंत्री पाटील यांनी केले.

लोकमत

# मानांकनासाठी आज विद्यापीठात पाहणी

कोल्हापूर : जागतिक स्तरावर उत्कृष्टतेचा मापदंड निश्चित करणाऱ्या 'इंटरनॅशनल ऑर्गनायझेशन फॉर स्टँडर्डालायझेशन' (आय.एस.ओ.) या संस्थेने शिवाजी विद्यापीठाला सन २०१९ मध्ये सर्वंकष शैक्षणिक गुणवत्तेसाठी 'आयएसओ-९००१:२०१५' मानांकनाचे प्रमाणपत्र प्रदान केले. हे प्रमाणपत्र मिळविणारे शिवाजी विद्यापीठ हे देशातील चौथे आणि राज्यातील पहिले अकृषी राज्य विद्यापीठ ठरले होते. प्रमाणपत्र देणाऱ्या संस्थेकडून यावर्षीच्या प्रमाणपत्रासाठी आज, मंगळवारी विद्यापीठाची ऑनलाईन पाहणी केली जाणार आहे.

31 AUG 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठास 'सेक्शन-८' कंपनीची मान्यता मिळणे अभिमानास्पद

## पालकमंत्री सतेज पाटील यांचे गौरवोद्गार; कुलगुरू डॉ. शिर्के यांना प्रदान केले मान्यतेचे पत्र

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे स्थापित 'शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशन'ला कंपनी कायद्यानुसार सेक्शन-८ कंपनी म्हणून मान्यता मिळणे ही अभिमानाची व आनंदाची बाब आहे. यामुळे विद्यापीठाला आता कौशल्य व स्टार्ट-अप कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिक गतिमानतेने कार्य करता येऊ शकेल, असे गौरवोद्गार पालकमंत्री सतेज पाटील यांनी काढले.

मान्यता मिळाल्याचे पत्र केंद्रीय कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाकडून प्राप्त झाले. पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते ते सोमवारी कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी पत्र स्वीकारले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशन'ला 'सेक्शन-८' कंपनी म्हणून मान्यता प्राप्त झाल्याचे पत्र कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांना प्रदान करताना पालकमंत्री सतेज पाटील. शेजारी अभिजीत रेडेकर, डॉ. पी.एस. पाटील, डॉ. विलास नांदवडेकर, व्ही.टी. पाटील, गजानन पळसे, डॉ. एस.एस. महाजन, डॉ. आर.के. कामत. (छाया : पप्पू अत्तार)**

मंत्री पाटील म्हणाले, विद्यापीठाने पुढील पाच वर्षांचा आराखडा तयार करावा. डिसेंबरपर्यंत कोल्हापूरचे विमानतळ पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. दोन महामार्गांनी हा भाग देशाच्या इतर भागांशी जोडलेला आहे. त्यामुळे आता जागतिक कनेक्टिव्हिटी वाढविण्याची संधी विद्यापीठास आहे. जिल्ह्यातील पूर व्यवस्थापनाच्या कार्यात संशोधकीय योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांनी ग्रंथभेट देऊन मंत्री पाटील यांचे स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. यावेळी विद्यापीठाचे वित्त व लेखाधिकारी व्ही.टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, डॉ. आर.के. कामत, आयक्यूएसी संचालक डॉ. एम.एस. देशमुख, डॉ. ए.डी. जाधव उपस्थित होते.

### ही आहेत कंपनीची वैशिष्टे

शिवाजी विद्यापीठाच्या 'शिवाजी विद्यापीठ संशोधव व विकास फौंडेशन'ला कंपनी कायद्यानुसार ना-नफा तत्त्वावरील 'सेक्शन-८' कंपनी म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. जलसंवर्धनाचे, पर्यावरणपूरक प्रकल्प प्रस्थापित करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, शिक्षणाच्या सर्व शाखांमध्ये प्रशिक्षण व संशोधन केंद्रांना प्रोत्साहित करणे, शिक्षणाच्या सर्व शाखांमध्ये दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण, आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन यांसाठी शैक्षणिक संस्थांच्या स्थापनांसाठी आवश्यक ते सहकार्य, मार्गदर्शन व प्रोत्साहन देणे, नैसर्गिक स्रोतांचे, साधनसंपत्तीचे संरक्षण आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या अनुषंगाने हरित व अपारंपरिक ऊर्जाविषयक संशोधन व उपक्रम राबविणे ही कंपनीची वैशिष्टे आहेत.

पुढारी

# विद्यापीठात आज ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. वाय. के. अलघ यांचे व्याख्यान

**कोल्हापूर : (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातर्फे मंगळवारी (दि. ३१) दुपारी २.४५ वाजता माजी केंद्रीय मंत्री व जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्रा. वाय. के. अलघ यांचे झूम ऑनलाईन प्लॅटफॉर्मवरून व्याख्यान होणार आहे.

'सिलेक्टेड इंडियन इकॉनॉमिक प्रॉब्लेम्स : इज देअर थिएरी बिहाइंड देम' या विषयावर प्रा. अलघ मार्गदर्शन करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. यशवंत थोरात यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. विद्यार्थी, संशोधक, शिक्षकांनी व्याख्यानाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. ज्ञानदेव तळूले यांनी केले आहे.

पुढारी

# प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना डी. वाय. पाटील विद्यापीठाचा जीवनगौरव पुरस्कार



कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

येथील डी. वाय. पाटील अभिमत विद्यापीठाकडून २०२१-२२ या वर्षाचा 'डॉ. डी. वाय. पाटील जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ व शिक्षणतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांना जाहीर करण्यात आला. विद्यापीठाचा वर्धापन दिन बुधवारी (दि. १ सप्टेंबर) सकाळी ९ वाजता साजरा होणार आहे. या कार्यक्रमात प्रा. पाटील यांना पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

प्रा. पाटील यांनी दीर्घकाळ शिवाजी विद्यापीठात अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले आहे. त्याशिवाय विद्यापीठ व सामाजिक संस्था, शासकीय विविध मंडळांवर सदस्य म्हणून कार्याचा ठसा उमटवला आहे. राज्य शासनाच्या नियोजन विभागाचे ते सदस्य होते. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे, शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष व भारतीय कृषी अर्थशास्त्र परिषदेचे उपाध्यक्ष होते. इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनीचे ते संचालक सदस्य आहेत. त्यांची इंग्रजी व मराठीमध्ये अर्थशास्त्राची अनेक पुस्तके प्रसिद्ध आहेत. अर्थशास्त्रावर प्रासंगिक भाष्य करणारे अनेक लेख राष्ट्रीय संशोधन पत्रिकेमधून विविध वृत्तपत्रांतून व मासिकांतून प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी संशोधन पदव्या प्राप्त केल्या आहेत. यापूर्वी विद्यापीठ व महाराष्ट्र राज्य उत्तम शिक्षक पुरस्कार, डॉ. श्री. आ. देशपांडे जीवनगौरव पुरस्कार आदी अनेक पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

याप्रसंगी प्रा. जे. एफ. पाटील यांच्या पाटील यांच्या 'अर्थाभिव्यक्ती' व 'इस्से इन इकोनॉमिक्स पर्शियन' या पुस्तकांचे प्रकाशन होणार आहे. जिल्हाधिकारी राहुल रेखावार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. कुलपती डॉ. संजय डी. पाटील अध्यक्षस्थानी असणार आहेत. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राकेश कुमार मुदगल विद्यापीठाच्या प्रगतीचा अहवाल सादर करणार आहेत. यावेळी डी. वाय पाटील शिक्षण संस्थेचे विश्वस्त आ. ऋतुराज पाटील, पृथ्वीराज पाटील, तेजस पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

सकाळ



कोल्हापूर : न्यू कॉलेजला ट्रॉफी प्रदानप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डी.डी. भोपळे, सूरज झिटे, प्रा. अमर सासने, डॉ. ए. एम. शेख, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. व्ही. टी. पाटील.

# न्यू कॉलेजला पाचव्यांदा क्रीडामहर्षी नागेशकर ट्रॉफी

कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाची क्रीडा विभागाची मानाची क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर ट्रॉफी सलग पाचव्यांदा यंदा न्यू कॉलेजने पटकाविली. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांना ही ट्रॉफी प्रदान केली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड, उपप्राचार्य डॉ.ए.एम. शेख, जिमखाना विभागप्रमुख अमर सासने आदी उपस्थित होते.

ही ट्रॉफी सर्व क्रीडा प्रकारात मिळालेल्या गुणांच्या आधारे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात असणा-या महाविद्यालयातून गुणानुक्रमे प्रथम येणा-या महाविद्यालयास दिली जाते. न्यू महाविद्यालयातील खेळाडूना संस्थेचे चेअरमन के. जी. पाटील, सूरज झिटे, दत्तात्रय भोपळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

31 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'सेक्शन-८ कंपनी' म्हणून मान्यता अभिमानास्पद

## पालकमंत्री सतेज पाटील : केंद्रीय कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाकडून शिवाजी विद्यापीठास पत्र प्राप्त

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातर्फे स्थापन केलेल्या 'शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशन''ला कंपनी कायद्यानुसार सेक्शन-८ कंपनी म्हणून मान्यता मिळाली आहे, ही अभिमानाची गोष्ट आहे, असे गौरवोद्गार पालकमंत्री सतेज पाटील यांनी काढले. तसेच कौशल्य व स्टार्ट-अप कंपन्यांना प्रोत्साहन देण्यासाठी अधिक गतिमानतेने विद्यापीठाला कार्य करता येईल, असेही त्यांनी सांगितले.

शिवाजी विद्यापीठ संशोधन व विकास फौंडेशनला 'सेक्शन-८' कंपनी म्हणून मान्यता मिळाल्याचे पत्र केंद्रीय कॉर्पोरेट अफेअर्स मंत्रालयाकडून प्राप्त झाले. पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते कुलगुरू डॉ. डी.टी.शिर्के यांना सुपुर्द करण्यात आले. याप्रसंगी पालकमंत्री पाटील बोलत होते.

पालकमंत्री पाटील म्हणाले, 'सेक्शन-८' कंपनी म्हणून मान्यता मिळाल्याने विद्यापीठास संशोधन व विकासाचे नवीन उपक्रम हाती घेण्यास मदत होईल. महाराष्ट्र नवोन्मेष सोसायटीच्या अटीअंतर्गत ही प्रक्रिया विद्यापीठाने तातडीने पूर्ण केली हे महत्त्वाचे आहे. दर्जेदार संशोधन असल्याचा शिक्कामोर्तब 'नॅक'च्या 'ए प्लस प्लस' मानांकनाने झाले आहे. त्यामुळे अनेक प्रकारचे निधी विद्यापीठाला मिळतील. त्याचा योग्य विनियोग करण्याच्या दृष्टीने विद्यापीठाने पुढील पाच वर्षांचा आराखडा तयार करावा. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील भूस्खलन आणि हवामान बदल यांविषयी संशोधन व विश्लेषण करण्यासाठी विद्यापीठाने नोडल एजन्सी म्हणून पुढाकार घ्यावा. पूर व्यवस्थापनाच्या कार्यातही आपले संशोधकीय योगदान द्यावे. यावेळी विद्यापीठातील सर्व अधिकारी उपस्थित होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित बैठकीत बोलताना पालकमंत्री सतेज पाटील. सोबत कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

### जागतिक कनेक्टिव्हिटी वाढवण्यास सज्ज व्हा

कोल्हापूर विमानतळ डिसेंबरपर्यंत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होणार आहे. दोन महामार्गांनी हा भाग देशाच्या इतर भागांशी जोडलेला आहे. जागतिक कनेक्टिव्हिटी वाढविण्याची संधी विद्यापीठासला असल्याने विद्यापीठाने त्यासाठी सज्ज व्हावे.

### 'सेक्शन-८ कंपनी'ची उद्दिष्टये

जलसंवर्धनाचे, पर्यावरणपूरक प्रकल्प प्रस्थापित करून प्रोत्साहन देणे. सर्व शाखांमध्ये प्रशिक्षण व संशोधन केंद्रांना प्रोत्साहित करणे. सर्व शाखांमध्ये दूरशिक्षण, ऑनलाईन शिक्षण, आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन यांसाठी शैक्षणिक संस्थां स्थापनांसाठी आवश्यक सहकार्य करणे. नैसर्गिक स्त्रोतांचे, साधनसंपत्तीचे संरक्षण आणि पर्यावरणाचे संवर्धन करण्याच्या अनुषंगाने हरित व अपारंपरिक ऊर्जाविषयक संशोधन व उपक्रम राबविणे. हरित विकासाला प्राधान्य देणे. स्टार्ट-अप प्रकल्प, कौशल्य विकासांना प्रोत्साहन देणे. आवश्यक तो निधी उभा करून उपक्रम राबविणे, विविध चॅरिटी पोर्टल, वेबसाईट उभारणे, ई-कॉमर्स सेवा निर्माण करणे. विविध संशोधन संस्थांमध्ये भागीदारीसाठी मध्यस्थ म्हणून भूमिका बजावणे. शासकीय, अशासकीय संस्थांच्या माध्यमातून उद्दिष्टपूर्तीसाठी, प्रबोधनासाठी कार्यशाळा, चर्चासत्रे इत्यादी कार्यक्रम घेणे.

तरुण भारत

# ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. वाय. के. अलघ यांचे आज व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने मंगळवार ३१ रोजी दुपारी २.४५ वाजता माजी केंद्रीय मंत्री व जवाहरलाल नेहरु विद्यापीठाचे माजी कुलगुरू ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. वाय. के. अलघ यांच्या व्याख्यानाचे आयोजन केले आहे. 'सेलेक्टेड इंडियन इकॉनॉमिक प्रोब्लेम्स: इज देअर थिएरी बीहाएंड देम' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. अध्यक्षस्थान कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के भुषवणार आहेत. हे व्याख्यान ऑनलाईन होणार असून, विद्यार्थी, प्राध्यापकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव तलुळे यांनी केले आहे.

तरूण भारत

# 'परदेशी शिक्षणाच्या संधी' विषयावर ८ सप्टेंबरला व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग व पाथसिड्स एज्युकेशन इन्स्टिट्यूटच्या संयुक्त विद्यमाने ८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पाथसिड्स एज्युकेशनल इन्स्टिट्यूटचे संचालक सलिल राजगुरू यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. 'परदेशातील शिक्षणाची संधी व प्रक्रिया' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय आहे. इच्छुकांनी https://forms.gle/WZovoAmxaFLEKA1TAA या लिंकवर नावनोंदणी करावयाची आहे.